# चैतन्य लहरी

मे / जून २००६

अंक क्र. ५/६



# आदिशक्ति पूजा, २००६













# अनुक्रमणिका


- श्री आदिशक्ती पूजा - २००६ वृत्तांत ........ २
- सहस्रार पूजा, २००६, वृत्तांत ........ ३
- सहस्रार पूजा (नारगोळ) ........ ४
- सेंट जॉर्ज दिन ........ ५
- मूलाधार -चक्र ........ ६
- प्रतिष्ठान, पुणे वृत्तांत ........ ९
- भारत - संतांची योगभूमी ........ १०
- उत्तरांचल राष्ट्रीय सहजयोग सेमिनार २००६ ........ १३
- श्री आदिशक्ती पूजा ........ १७


सहजयोग्यांनी वारंवार विचारणा करुन मागणी केल्यामुळे त्यांच्या सोईसाठी, निर्मल इन्फोसिस्टीम् ॲण्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि. तर्फे प्रकाशित होणारी सर्व पुस्तके, चैतन्य लहरी, भजनांची व भाषणांच्या सी.डी., व्ही.सी.डी. ऑडिओ कॅसेट सोमवार ते शुक्रवार दररोज सकाळी ९.३० ते संध्याकाळी ६.३० यावेळात निर्मल इन्फोसिस्टीम् ॲण्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि च्या कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. आपणास हवे असलेले साहित्य अगोदर कंपनीच्या फोनवर संपर्क साधून कळविल्यास आपण येण्यापूर्वी ते व्यवस्थित पॅकिंग करून आपल्यासाठी तयार ठेवण्यात येईल. तसेच पुणे परिसरातील सहजयोग्यांसाठी साहित्य घरपोच पोहचविण्यासाठी लोकल कुरियरची व्यवस्था लवकरच सुरू करीत आहोत.

सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट, सी.डी. पुस्तके, मासिके, श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्यलहरी व युवादृष्टी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था ''निर्मल इन्फोसिस्टीम ॲण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि पुणे'' या कंपनीमार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, निर्मल इन्फोसिस्टीम् ॲण्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि.या कंपनीच्या लेखी परवानगीशिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करू नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लीडरवर राहील.

तसेच चैतन्य लहरी मराठी मासिकाचे सन २००६ सालासाठी नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT.LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. सभासदांची वार्षिक वर्गणी मागील वर्षाप्रमाणेच अंक हातपोच घेणाऱ्यासाठी रुपये २००/- व पोष्टाने मागविणाऱ्यांसाठी रुपये २२५/- एवढी ठेवली आहे. तसेच परगांवच्या सहजयोग्यांनी शक्य झाल्यास ग्रुप बुकिंग केल्यास अंक पोष्टाने पाठविताना सोईचे होईल. कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT.LTD.
BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD,
KOTHRUD,PUNE 411 029. TEL. 020 25286537



# श्री आदिशक्ती पूजा २००६ वृत्तांत

Oxfordshire मधील थेम्सच्या किनारी असलेल्या Henley येथे असलेल्या हिरव्यागार अशा ग्रामीण भागात श्री आदिशक्ती पूजा २००६ साजरी करण्याचे भाग्य येथील लोकांना लाभले. पूर्ण जगभरातून जवळजवळ १८०० सहजयोगी बंधु-भगिनी या पूजेसाठी जमले होते. ऑस्ट्रेलियासारख्या दूर देशातूनही सहजयोगी आले होते. हे सर्व जण पवित्र थेम्स नदीकाठी असणाऱ्या दर्यावर्दी आणि टुमदार अशा नौकानगरीत स्विसफार्म आंतरराष्ट्रीय कँपसाईट येथे जमले होते.

बेल्जियम, डेन्मार्क, फिनलँड, नेदरलँड, नॉर्वे, स्पेन, स्वीडन आणि यु.के. या यजमान राष्ट्रांतून आलेले सहजयोगी अविरतपणे मेहनत घेऊन सहज-नगरी उभारण्यात गर्क होते. त्यामध्ये विद्युत रोषणाई, विविध रंगी पताका यांनी सजविलेले शुभ्र स्तंभ त्या हिरव्यागार हिरवळीत सुंदर दिसत होते.

या दिवसांमध्ये वातावरण प्रसन्न करणारा सूर्योदय लाभला होता. आश्चर्यकारक वातावरण लाभले होते. आकाशात निळ्या रंगांच्या छटा, अधूनमधून विविध आकारांचे ढग फिरत होते. येथे असे वातावरण क्वचितच असते.

कार्यक्रमाची सुरूवात शुक्रवारी सायंकाळी झाली. यामध्ये संगीत, नृत्य, गाणी असे कार्यक्रम अनेक सहजयोगी बंधु-भगिनींनी सादर केले. त्या सर्वांना त्यांच्यातील विविध गुणदर्शन -कौशल्ये सादर करण्याची संधी मिळाली. Chiswick येथील श्रीमाताजी व श्रीपापाजी यांच्या निवासस्थानातून हा कार्यक्रम त्यांना थेट पहाता येईल अशी दूरप्रक्षेपणाची व्यवस्था केली होती.

स्पेनच्या कलाकारांनी भगवान श्रीकृष्णांच्या जीवनाचे अप्रतिम दर्शन, विविध नृत्यांची गुंफण करून घडवून आणले. हिंदुस्थानी कलावंतांनी आपल्या वाद्यप्रणालीतून विशेष कार्यक्रम साजरा करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. यात सतारवादक मेहबूब नदीम, तबलावादक शाहबाज हूसेन खान, यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांनी सहस्रारपूजेच्या वेळी देखील कार्यक्रम सादर केला होता.

रविवारी तर पूजेची तयारी जोरात चालू होती. ज्या सायंकाळची आम्ही आतुरतेने वाट पहात होतो, ती सायंकाळ आली. श्रीमाताजींची गाडी येण्याच्या वाटेवर अनेक दीप हातात घेऊन सहजयोगी उभे होते. एकीकडे मंगल वाद्ये, युवाशक्तीच्या हातांमध्ये रंगीबेरंगी पताका, खरंच साक्षात आदिशक्ती येत असल्याचे प्रत्यंतर होत होते.

लहान मुलांनी श्रीमाताजींच्या चरणांवर फुलांच्या पाकळ्या वाहून त्यांची पूजा केली. सर्वांनी भजने म्हटली. पूजेचा कार्यक्रम २ तास चालला. त्यानंतर श्रीपापाजींनी सर्वांनी सहजयोग प्रचार , प्रसाराचे कार्य जगभर करावे असा संदेश दिला.

खरच पूजा अवर्णनीय झाली. ● ● ●



# सहस्रार पूजा, २००६, वृत्तांत

Chalfont Scout Camp

संपूर्ण जगभरातून सहस्रार दिन साजरा करण्यासाठी लोक आले होते. लंडनच्या पश्चिमेस रम्य पार्श्वभूमीवर असलेल्या Chalfont Heights चे रूपांतर शांती, आनंद आणि अध्यात्मिकता यांनी युक्त अशा आश्चर्यजनक स्थळात झाले. उपलब्ध सोयी आणि भोवतालचा निसर्ग यांच्यामुळे लवकरच सर्वजण ध्यानमग्न अवस्थेकडे गेले.वातावरणात प्रसन्नता येण्यासाठीच, आम्हाला उल्हसित करण्यासाठीच जणू आकाशात थोडेसे ढग जमले होते.

शुक्रवारी स्वयंपाकगृह जोरदार कार्यरत होते, आणि जगभरातून आलेल्या १७५० योग्यांची नोंदणी अतिशय उत्साहपूर्ण प्रेममयी वातावरणात झाली. सायंकाळी एक मनोरंजनाचा कार्यक्रम झाला.

सर्वत्र आनंद घेऊन येणारी शनिवारची पहाट उगवली आणि एका आश्चर्यजनक अशा पूजेच्या कार्यक्रमाची चाहूल लागताच, सहजयोग्यांना दूर दूर ठिकाणांहून आणणाऱ्या विविध प्रवासी गाड्या येऊ लागल्या. सहजयोग्यांची संख्या झपाट्याने वाढू लागली. विविध सुविधांनी आपला प्रभाव दाखविण्यास प्रारंभ केला; आणि वेळ, विचार आणि अवकाश यांच्या अतीत असणाऱ्या मितीत आम्ही प्रवेशलो. हे सर्व आपोआप कसे घडत होते याचे आम्हाला आश्चर्य वाटत होते.

सामूहिकतेतील सर्व सदस्यांच्या गरजा पूर्ण करणारी यंत्रणा कार्यरत असताना आम्ही मात्र यामागे असणाऱ्या परमेश्वरी शक्तीतच विचारमग्न झालो. अर्थात श्रीमाताजीच हे सर्व घडवून आणतात! त्यादिवशी हवामान खात्याच्या अंदाजानुसार वातावरण उदास राहण्याची भविष्यवाणी असताना देखील आश्चर्य म्हणजे वातावरण अतिशय प्रसन्न राहिले. जेवणात अनेक सुग्रास पदार्थ , जगभरातील अनेक सहजयोगी बंधू-भगिनींची भेट, सर्वत्र पसरलेले चैतन्य यामुळे सर्वत्र आनंदाचे साम्राज्य पसरले होते.

Chiswick येथील श्रीमाताजींच्या निवासस्थानातील कार्यक्रम कॅम्पमधील सर्वांना प्रत्यक्षपणे पहाता यावा यासाठी काही यंत्रणा जोडली होती. एकूणच, Chalfont च्या मुख्य सभागृहात एकत्र बसणे, श्रीमाताजींचे स्क्रिनवर दर्शन होणे, पूजेत सहभागी होणे, जगभर असणाऱ्या सर्व सहजयोग्याना वेबसाईटद्वारे जोडले जाणे, त्यांनाही याचा लाभ होणे हा सर्व अनुभव आपल्या कल्पनाशक्तीच्या पलीकडचा होता. खरंच! पूजेच्या वेळी श्रीमाताजींच्या Chiswick येथील घरी चाललेल्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण केल्यामुळे सर्वजण खुष झाले.

साक्षात आदिशक्तीचे दर्शन घेण्याचे सौभाग्य आम्हाला लाभत होते ही केवढी दुर्लभ घटना होती ! वातावरणातील प्रचंड चैतन्यावरून, हा कार्यक्रम ऐतिहासिक होणार असे वाटले. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे पेंडॉलमध्ये बसलेल्या सर्वांना त्याच यंत्रणेद्वारे श्रीमाताजीदेखील पहात होत्या. म्हणजेच सर्वांवर श्रीमाताजींची कृपादृष्टी पडत होती.

आम्ही सर्वजण जणू काही स्वर्गसुख अनुभवत होतो. ● ● ●

# सहस्रार पूजा (नारगोळ)

नारगोळ येथे श्रीमाताजींची निराकार रूपातील सहस्रार पूजा साजरी करण्यासाठी जवळ जवळ ४०० सहजयोगी बंधु-भगिनी जमले होते. ह्या ठिकाणीच श्रीमाताजींनी मानव जातीचा उद्धार करण्यासाठी विश्वाचे सहस्रार उघडले होते. (दि. ५ मे १९७०रोजी)स्वत: श्रीमाताजींनीच एकदा म्हटले होते, नारगोळ म्हणजे सहस्रार.

आपल्या प.पू.श्रीमाताजींनीच या ऐतिहासिक घटनेचे वर्णन पुढील प्रमाणे केले होते.

''ज्याक्षणी सहस्रार उघडले गेले त्याक्षणी संपूर्ण वातावरण चैतन्यानी ओसंडून वाहत होते. सर्व आसमंतात प्रचंड प्रकाश दिसला आणि जणूकाही मुसळधार पावसाच्या वर्षावाप्रमाणे, प्रचंड शक्तीनिशी हे सर्व पृथ्वीतलावर आले. हे सर्वच अनपेक्षित व आश्चर्यकारक होते. त्या सर्व भव्यदिव्यपणामुळे मी भारावून गेले आणि अवाक् झाले. आदिशक्ती कुंडलिनीचा रंग तापलेल्या भट्टीप्रमाणे, एखाद्या तप्त धातूप्रमाणे असूनही अतिशय शांतता प्रदान करणारा होता. त्याला विविध रंगांची छटा होती. ज्याप्रमाणे जळता निखारा हा ठिपक्या ठिपक्या प्रमाणे दिसतो त्याचप्रमाणे कुंडलिनीचे दर्शन होत होते.''

नारगोळ येथे कार्यक्रम दि. ६ मे पासूनच चालू झाले. एक छोटीशी कार्यशाळा घेण्यात आली. त्यामध्ये चैतन्याचे आदान प्रदान करण्यात आले. प्रार्थना व भजने झाली. सर्व नकारात्मक शक्तींचा विनाश करण्यासाठी हवन झाले. त्यावेळी श्रीमाताजींची १०८ नावे घेण्यात आली. तेव्हां वातावरणात प्रचंड प्रमाणात चैतन्य जाणवत होते. बऱ्याच जणांच्या कॅमेऱ्यात मिरॅकलचे फोटो आले.नंतर सायंकाळी नारगोळ येथील दिवाळी पूजेची सी. डी. दाखविणात आली.त्यानंतर डॉ राजेश युनिव्हर्स यांनी भजने सादर केली.

दिनांक ७ मे रोजी सकाळच्या ध्यानानंतर सहजयोगाचा ध्वज सर्व सहजयोग्यांनी रॅलीमधून फिरविला. नंतर सहजयोगका ध्वज लहरायेंगे, आवाज उठायेंगे ही भजने झाली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रतीक म्हणून सहजयोगाचा ध्वज दैवी निर्मल वृक्षावर लावण्यात आला.(हाच तो वृक्ष- ज्याखाली प.पू.श्रीमाताजी ५ मे १९७० रोजी सहस्रार उघडण्याच्या वेळी बसल्या होत्या.)

त्यानंतर श्रीमाताजींच्या पवित्र चरणकमलांचे दर्शन ज्या समुद्रकिनाऱ्याने घेतले होते, त्याच किनाऱ्यावर सर्वजण गेले. सर्वांना पुन्हा एकदा गणपतिपुळ्याची आठवण झाली.प्रत्यक्ष पूजेच्या वेळी स्वागतगीत, विनती सुनिये, हेमजा सुतम, हासत आली निर्मल आई, तुझ्या पूजनी अर्चनी, तेरेही गुण गाते है, विश्व वंदिता, ही भजने व नंतर आरती झाली

सर्वांनी चैतन्याचा मनसोक्त आनंद घेतला. नंतर महाप्रसाद झाला.

लॉस एनजिल्स अमेरिका मध्ये होणाऱ्या पूजांच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत.

दिनांक ११ ते १३ ऑगस्ट - श्रीकृष्ण पूजा

- दिनांक १८ ते २० ऑगस्ट - श्रीगणेश पूजा

(या पूजेमध्ये लग्नसमारंभ होईल)

- दिनांक १५ ते १७ सप्टेंबर - नवरात्री पूजा



## श्रीमाताजींचे यु.के.मध्ये आगमन

ज्या क्षणाची आम्ही प्रतीक्षा करत होतो,तो क्षण आला. दिनांक २२ एप्रिल २००६ रोजी सायंकाळी ६ वाजता अखिल विश्वाच्या स्वामिनी श्रीमाताजी, Heathraw विमानतळावर आल्या. यु.के.च्या सहजयोग्यांनी Chiswick Town Hall मध्ये एका स्वागत समारंभाचे आयोजन केले होते. त्या आमंत्रणाचा श्रीमाताजी व श्रीपापाजी यांनी अत्यंत आनंदाने, प्रेमाने स्वीकार केला. त्याची तयारी संपूर्ण दिवस चालू होती. कुणी स्वागताची तयारी करण्यात गुंतले होते, तर कुणी हॉल सजविण्यात, तर कुणी भजनांचा सराव करण्यात.

सर्व सहजयोगी अत्यंत उत्कंठेने श्रीमाताजींच्या दर्शनाची प्रतीक्षा करत असतांनाच सायंकाळी ८ वाजता श्रीमाताजींचे हॉलमध्ये आगमन झाले. सर्व सहजयोग्यांच्या वतीने Dr.David Spiro यांनी स्वागतपर भाषण केले. ते फारच छान झाले. सर. सी.पी. साहेबांनी नेहमीप्रमाणे उदंड प्रतिसाद देत, यु.के.च्या भूमीवर पदार्पण केल्यावर वाटणारी प्रसन्नता व्यक्त केली. यु.के. च्या मुलांनी केलेली काही प्रेझेंट्स श्रीमाताजींना देण्यात आली. त्याम्ध्ये एक चित्र असे होते की, ज्यामध्ये अश्वारूढ झालेले सेंट जॉर्ज हे ड्रेगॉनचा विनाश करीत आहेत. याला विशेष महत्त्व आहे. कारण सेंट जॉर्ज हे इंग्लंडमधील एक थोर संत होते, आणि त्यांच्या नावे बांधलेल्या वास्तूत श्रीमाताजी यांचे वास्तव्य आहे. २३ एप्रिल हा खरोखरच इंग्लंडदिन म्हणावा लागेल.

एव्हाना भजन ग्रुपने सिटींग इन दि हार्ट ऑफ द युनिव्हर्स हे भजन गायला सुरवात केली. वातावरणात प्रचंड चैतन्य ओसंडून वाहत होते. कार्यक्रम अगदी थोडक्या वेळातच संपला आणि श्रीमाताजी व श्रीपापाजींनी आपल्या निवासस्थानाकडे प्रस्थान केले. त्यानंतर सर्व सहजयोग्यांनी वातावरणात सर्वत्र पसरलेल्या चैतन्याचा बराच काळ आनंद लुटला. श्रीमाताजींच्या भेटीच्या आनंदाने सर्वांनी भजने म्हटली. त्यानंतर, लंडनमध्ये असलेल्या भारतीय सहजयोगी बंधु-भगिनींच्या प्रेमळ सहकार्यामुळे, अत्यंत रुचकर पदार्थांचे भोजन सर्वांना देण्यात आले.श्रीमाताजी व श्रीपापाजींचे स्वागत करण्याचे भाग्य व आनंद सर्वांना लाभल्यामुळे सर्वजण खुष होते.

●●●

## सेंट जॉर्ज दिन



इंग्लंडमध्ये २३ एप्रिलला एक आगळेच महत्त्व आहे. सन १५६४ मध्ये २३ एप्रिल या दिवशी विल्यम शेक्सपिअर यांचा जन्म झाला आणि इंग्लंड हा दिवस राष्ट्रसंत जॉर्ज यांचा दिन म्हणून साजरा करतो. सहजयोग्यांना तर हा दिवस आणखीच विशेष वाटतो. कारण संत जॉर्ज (सेंट जॉर्ज) हे श्री भैरवांचे अवतार होते. हा दिन आपल्या प.पू.श्रीमाताजींसमवेत साजरा करण्यास आम्हाला अनुमती दिली गेली, त्यामुळे आम्हाला अतिशय आनंद झाला.U.K.शी संबंधित अशा विविध थोर व्यक्ती कार्यक्रमास उपस्थित होत्या.शांतता, प्रेम, आदर, आणि आमच्यापुढे उपस्थित असणारे मूर्तिमंत्र पावित्र्य यामुळे निर्माण झालेले वातावरण शब्दांनी व्यक्त करणे अशक्यच होते. ते प्रत्यक्ष अनुभवणे एवढाच मार्ग होता.

●●●

# मूलाधार -चक्र

(प.पू.श्रीमाताजींनी वेळोवेळी श्रीगणेश व मूलाधार-चक्राबद्दल मार्गदर्शन केलेले आहे. त्या वेगवेगळ्या भाषणातील महत्त्वाचे व मुख्य अंश एकत्रित करून खाली दिले आहेत. प्रवचन/पूजा-भाषणांची स्थाने वेगवेगळी असल्याने प्रत्येक कंसा मध्यें पूजेच्या/प्रवचनाच्या स्थानाचा उल्लेख केला आहे. शक्य तेवढी सुसूत्रता राखण्याचा प्रयत्न केला आहे.)

- पाठीच्या कण्याच्या बाहेर अगदी खालच्या बाजूला, म्हणजेच 'मूलाधार' मधील कुण्डलिनी-स्थानाच्या खालच्या बाजूचे चक्र मूलाधार -चक्र. इथे श्रीगणेशदेवता आहे. त्यांची मुख्य शक्ती (गुण) म्हणजे अबोधितता आणि सुज्ञता. कालान्तराने तेच येशू-ख्रिस्त स्वरूपांत आले (ह्यूस्टन)
- श्रीगणेश पावित्र्याची आणि मांगल्याची शक्ती आहेत आणि धरणीमातेमधील व आपल्यामधील चुंबकशक्तीचे दैवत आहेत. (सॅनडिआगो)
- मूलाधार-चक्र, रक्तवर्णी असून पाठीच्या कण्यामधील चक्र-नाडी-संस्थेचा आधार आहे. त्यामधील उर्जेमधून निरागसता मिळते. त्यांचे रूप पशू आणि मानवतेचा उगम दर्शवणारे आहे. त्यांचे गजमुख पशूमधील निष्पापता आणि अहंकार नसल्याचे द्योतक आहे, त्याला पाप जणू माहीतच नसते. श्रीगणेश म्हणजे साकार झालेली निष्पापता व निरागसता. परमतत्त्वाने परिपूर्ण असे ते आहेत; म्हणून त्यांचे ख्रिस्तरूपांत अवतरण झाल्यावर त्यांचा पुनरुद्धार झाला. आपल्यामधील प्रत्येक चक्रावर त्यांच्या निरागसतेचे आशीर्वाद आहेत (कॅक्सटन हॉल)
- आपल्यामधील सर्वात खालचे पाल्व्हिक प्लेक्सस हे त्याचे स्थूल प्रतीक हे त्याला चार पाकळ्या आहेत जे त्याचे दुय्यम भाग आहेत; त्यातील एक जननेंद्रियाचे कार्य चालवते. सर्वात वरच्या भागातून कुण्डलिनीची हालचाल नियंत्रित होते. मानवामधील जननधारणा, उत्सर्जन व कामजीवनाचे कार्य या चक्राद्वारे चालते (ह्यूस्टन)
- मूलाधार चक्र मूलाधारात असलेल्या कुण्डलिनीच्या खालच्या बाजूला असल्यानें कुण्डलिनी उत्थापन होत असतांना मूलाधार चक्रातून जात नाहीं, अर्थात विषयसेवनाचा (Sex) कुंडलिनी-जागृतीशी काही संबंध नाही (कॅक्स्टन हॉल)
- मूलाधार-चक्राच्या डाव्या बाजूला पकड असणें फार धोक्याचे असते; अनेक धोकादायक आजार-कॅन्सर, सिझोफ्रेनिया, एड्स इ. -होण्याची शक्यता असते (ऑस्ट्रिया)
- मूलाधार-चक्र स्वच्छ ठेवणे फार आवश्यक आहे. महाराष्ट्रात असाल आणि या चक्राचा त्रास असला तर जमिनीवर बसून डावा हात फोटोसमोर व उजवा हात जमिनीवर ठेवा आणि गणेश-मंत्र किंवा अथर्वशीर्ष म्हणा. असे केल्याने डावी बाजू स्वच्छ होते. मदत म्हणून संपूर्ण डावी बाजू स्वच्छ करणे जास्त चांगले. महाराष्ट्रातच मूलाधार-चक्राचे विशेष स्थान असल्यामुळे तुम्हाला अधिक फायदा मिळतो आणि हे चक्र सुधारल्यामुळें मांगल्याने व पावित्र्याने तुम्ही पल्लवीत होता. उघड्यावर असाल तर जमिनीवर बसून डावा हात सूर्याकडे व उजवा जमिनीवर ठेवून ध्यान करा (धुळे)
- मूलाधार-चक्राची नीट काळजी घेतली नाही तर आपल्या शक्त्या क्षीण होतात आणि

निगेटिव्हिटीला आपण लवकर बळी पडतो. त्याचबरोबर मूलाधार-चक्र सक्षम असते तेव्हा आपल्यामधील महाकाली शक्तीही अधिक कार्यक्षम होते. (व्हॅन्कोव्हर प्रोग्राम)

- त्याचबरोबर फुलांचे आदानप्रदानही उपयोगी आहे; फुलांचे नैसर्गिक सौंदर्य स्वाधिष्ठानाची व त्यांचा सुवास मूलाधार चक्राची चांगली स्थिती दर्शवतो (चेल्सहम रोड)
- श्रीगणेश आदि-देवता आहेत. सुज्ञता, मांगल्य, पावित्र्य, शुद्धता, निरागसता व चैतन्य हे त्यांचे गुण आहेत; म्हणून त्यांना प्रथम-वंदिता म्हटले जाते. सगळे गण त्यांच्या अधिपत्याखाली काम करतात. चैतन्यामध्ये, म्हणजेच अणु-रेणूंमध्ये त्यांचा वास आहे. प्रत्येक वस्तूच्या मूलस्वरूपांत ते सिद्ध आहेत. (राहुरी; संक्रांत पूजा)
- श्रीगणेश सर्व चक्रांवर आहेत. ते पावित्र्याचे साक्षात रूप असल्यामुळे त्यांच्याशिवाय काहीही घडू शकत नाही. (कळवा)
- त्यांचंव पावित्र्य, शुद्धता व सुज्ञता आपल्यामध्ये किती आहेत हे प्रत्येकाने विचारपूर्वक पाहिले पाहिजे; त्यासाठीं प्रगल्भता असायला पाहिजे; त्यासाठी कुण्डलिनीकडे ती परमचैतन्याशी किती जोडली गेली आहे हे लक्षात घ्यायला पाहिजे. रोजच्या ध्यानामधून ही प्रगती मिळवली पाहिजे. म्हणून ध्यान हे कर्मकाण्डासारखे न करता; जेव्हा केव्हां मनांत येईल तेव्हा ते सहज झाले पाहिजे; मग ध्यान न करतां तुम्ही ध्यानांत आल्याचे तुम्हाला जाणवेल. (कळवा)
- श्रीगणेश सर्वांगावर शेंदूर (red lead-oxide)लावून आहेत. त्यांने शरीर थंड राहते. त्यामुळे उष्णतेचा परिणाम होत नाहीं (जर्मनी)
- श्रीगणेश लहान बालकासारखे निरागस आहेत; बालस्वरूप आहेत. त्यांचे मस्तक हत्तीचे आहे, हत्ती सर्व प्राण्यांमध्ये हुषार प्राणी आहे, त्याला अहंकार वा प्रति-अहंकार नसतो (कबेला सॅन डिआगो)
- ते चतुर्भुज आहेत व उंदीर हे त्यांचे वाहन आहे. सर्व देवतांच्या शक्त्यांचे ते अधिष्ठान आहेत. त्यांच्यामध्ये अद्भुत लोहचुंबक-शक्ती आहे, पक्ष्यांचे स्थलांतरण, मानवा-मानवामधील आकर्षण वा अनाकर्षण ह्यामध्ये त्यांचीच शक्ती असते. ते जितके शक्तिमान आहेत तितकेच खेळकर आहेत; पण त्याबरोबर आईच्या विरोधांत कार्य करणाऱ्यांचा त्यांना अत्यंत क्रोध होतो- म्हणून त्यांच्या हातात आसूड (अंकुश) व पाश आहेत. तेच राधा-कृष्णांचे पुत्र व नंतर ख्रिस्त-रूपांत आले. त्यांना पार्वतीने एकटीनेच निर्माण केले. (ऑस्ट्रिया; सेन्ट डिॲगो)
- श्रीगणेश मूलाधार-चक्राची देवता आहेत; परब्रह्म-स्वरूप आहेत अर्थात साक्षात परब्रह्माचेच साकार रूप आहेत. प्रत्यक्ष परमात्मस्वरूप असल्यामुळें ख्रिस्तांचा अवतार घेऊं शकले व त्या रूपांत देहरूपांतून उद्धार होऊ शकला. (ब्रह्मतत्त्वावर प्रवचन-लीड्स).
- मानवाच्या प्रत्येक चक्रावर त्यांची निरागसता कार्य करत असते. पाप आणि अहंकार यांचा पूर्ण अभाव असल्यामुळें ते साक्षात निरागसताच आहेत. (कॅक्स्टन हॉल)
- मूलाधार चक्र शक्तिशाली असले की महाकाली शक्ती प्रबळ असते; तिची सर्व शक्ती ओमकारामधून (अर्थात श्रीगणेश) आणि श्रीगणेश-शक्ती म्हणजेच महाकालीबद्दलचे प्रेम आणि तिच्या दुष्टांचे

निर्दालन करणाऱ्या शक्तीबद्दल आदर. (व्हॅंकोव्हर प्रोग्राम)

- श्रीगणेश जागृत झाले की आपल्या डोळ्यांमध्ये तेज येते; मोह व आसक्ती दूर होतात आणि डोळ्यांमधील तेजामुळे आजूबाजूचे सर्वजण भारून जाऊन शुद्ध होतात. कुण्डलिनीचे जागरण व उत्थापन श्रीगणेशांच्या आज्ञेनुसारच होत असते त्यासाठी तुम्हाला क्षमा करण्यास ते सदैव तत्पर आहेत. (बर्लिन)
- ते पूर्ण सहजावस्थेत आहेत, सहज कार्य घटित करणारे आहेत, सर्व विघ्नांचा नाश करणारे आहेत, सर्व चमत्कार घडवून आणणारे व तुम्हाला आनंद देणारे आहेत, तुमचे सर्व संबंध सुरळीत करणारे आहेत, सर्वत्र सुगंध पसरवणारे आहेत, दुसऱ्याच्या अहंकाराला सामोरे जायला धीर देणारे आहेत; त्यांची शक्ती अप्रगट असूनही फार कार्यशाली आहे. (सॅन डिआगो)
- श्रीगणेशांची सर्व शक्ती डाव्या विशुद्धीमधून प्रकट होते. आपल्या डाव्या बाजूच्या सुरवातीला व शेवटी श्रीगणेश आहेत. त्यांचा सर्वात मोठा गुण म्हणजे ते मातेला पूर्णपणें शरणागत आहेत; माता म्हणजेच त्यांचा एकमेव परमेश्वर; दुसरा कुठला देव ते जाणत नाहीत; इतकेच नव्हे तर त्यांचा पिताही त्यांना माहीत नाहीं इतके ते मातेला मानतात; आई कशाने प्रसन्न होईल हेच पाहतात. (बिंबल्डन,लोणावळा, कोल्हापूर, पॅरिस, सॅन डिआगो)
- चिरकाल बालक, सुज्ञता प्रदान करणारे, आईबद्दलच्या आदराचा आदर्श, सर्व देवतांमध्ये महापराक्रमी असे हे दैवत आहे. <u>सामुहिक दुष्कर्मांचे परिपालन व शासन देणाऱ्या नैसर्गिक आपत्ती तेच घडवून आणतात.</u> (फ्रान्स)
- आईच्या गर्भातील अर्भकाची उत्पत्ती व वाढ, त्याचा रंग चेहरा हे त्यांच्याकडूनच घडवले जाते, त्यासाठीं योग्य जीन्सचे व्यवस्थापन तेच बघतात. हे केवढे महान कार्य ते करत आहेत हे समजून घ्या. इतके व्यग्र असूनही ते सदैव आनंदी असतात. (स्वित्झर्लंड)
- युरोप, अमेरिका आणि इंग्लंडमधील लोक श्रीगणेश मानत नाहीत, त्यांच्या शक्तीला ते ओळखत नाहीत. त्यामुळे ते लोक श्रीगणेशांच्या आशीर्वादाला मुकले आहेत. श्रीगणेशांची विशेष शक्ती म्हणजे ते तुमच्यामध्ये निरागसता जागृत करतात; आपल्याला निरागसतेचा आदर, कौतुक करण्याची शक्ती पुरवतात. ही निरागसता मग तुमच्या जीवनशैलीमध्ये, तुमच्या पेहरावात उतरते. सहजयोग्यांचा पेहराव भारदस्त तसाच आधुनिक पण चित्ताकर्षक असावा, उत्तान पेहराव सहजयोग्यांना शोभत नाही.हे पुरुष व स्त्रियांनी दोघांनी लक्षपूर्वक सांभाळले पाहिजे. (बार्लिन)
- श्रीगणेशांची डाव्या विशुद्धीमधून व्यक्त होणारी शक्ती सुप्त रूपात कार्य करत असते. ती प्रस्थापित करणें म्हणजे उच्छसूठ बंधन घेणे वा चैतन्य देणे नव्हे तर ते केल्यावर हरवून न जातां आपल्या चुका लक्षात घेऊन त्या सुधारण्याकडे लक्ष देणें; आपल्या चुकांना स्वत:ला अपराधी न समजता सामोरे जाणे व सुधारण्याचा प्रयत्न करणें. (बर्लिन)
- मला सांगायची तिसरी गोष्ट म्हणजे जो निरागस असतो त्याला कशापासूनही भय नसते; देवच त्याचा सांभाळ करत असतो; त्याला त्रास देणाऱ्यापासून त्याचे संरक्षण करत असतो. जगात जेव्हा बालकांची हत्या केली जाते किंवा निष्पाप लोकांवर हल्ला होतो तेव्हा सर्व समाज त्याच्या

विरोधात एक होतो; इतिहासात अशी अनेक उदाहरणे दिसून येतील. या विरोधामागेही श्रीगणेशांची शक्ति असते. म्हणून सहजयोग्यांनी आपले गणेश-तत्त्व व्यवस्थित सांभाळले पाहिजे; नाहीतर सहजयोगाला भवितव्य उरणार नाही. तेव्हा सहजयोगी बंधु-भगिनींना माझी प्रेमाची विनंती आहे की त्यांनी आपल्या गणेशतत्त्वाची खूप काळजी घ्यावी (बर्लिन)

- सहजयोगामध्ये श्रीगणेश सर्वांचा -अध्यक्ष- असतो, विद्यापीठासारखा कुलगुरू असतो; त्याने पदवी दिली तरच आपण एक-एक चक्र पार होऊशकतो आणि आपण कुठे आहोत याची जाणीव करून देतो; यथावकाश निर्विचार समाधी व निर्विकल्प समाधी प्रदान करतो. त्याहूनही मुख्य म्हणजे तो आपल्याला -आनंद- मिळवून देतो, त्याचबरोबर आपल्या हिताचे व कल्याणाचे आहे हे आपल्याला शिकवणारे श्रीहनुमान आहेत (जर्मनी)
- असे हे गणेश-दैवत आपल्याला आत्मविद्या देणारे, गहनतेमध्ये प्रगती मिळवून देणारे असे फार महान दैवत आहे (बर्लिन)

## प्रतिष्ठान, पुणे वृत्तांत

### १५ एप्रिल ते २१ एप्रिल २००६

श्रीमाताजी ऑस्ट्रेलियाहून परत इंग्लंडला जाण्यापूर्वी प्रतिष्ठानमध्ये साधारण एक आठवड्यासाठी आल्या होत्या. त्या शनिवार दिनांक १५ एप्रिल २००६ रोजी रात्री ११.४५ वा च्या सुमारास श्रीमाताजींचे भारतात मुंबई सहारा एअरपोर्टवर आगमन झाले होते. त्यांच्या सोबत श्री पापाजी व साधनादीदी होत्या. त्यानंतर श्रीमाताजी,श्रीपापाजी व साधनादीदी खास गाडीने पुण्याला रवाना झाल्या.सोबत पोलिस स्क्वाड होते. श्रीमाताजी आज फार खुष होत्या. प्रवासात लोणावळा येथे श्रीमाताजी ५ मिनिटांसाठी थांबल्या होत्या. त्यानंतर पहाटे ४.०० च्या सुमारास इस्टर पूजेच्या पवित्र दिवशी आदिशक्तीचे प्रतिष्ठानवर आगमन झाले. त्यानंतर त्यांची आरती केली.त्यांच्या चरणावर ट्रस्ट्री श्री राजेंद्र पुगालिया यांनी हार अर्पण केला. आज श्रीमाताजी अत्यंत प्रसन्न व आनंदी होत्या.

दुसऱ्या दिवशी दिनांक १६ एप्रिल २००६ रोजी रात्री ९.०० च्या सुमारास इस्टर निमित्त प्रतिष्ठानवर पूजा आयोजित केली होती. श्रीमाताजींच्या शयनकक्षेत पूजेची तयारी केली होती. श्रीमाताजींना सुगंधी फुले श्री राजेंद्र पुगालिया यांनी अर्पण केली. त्यानंतर श्री पराग राजे व राजेंद्र पुगालिया यांनी श्रीमाताजींच्या चरणावर अत्यंत सुगंधी पिवळ्या चाफ्याचा हार अर्पण केला. त्यानंतर श्रीमाताजींच्या समोर केक मांडण्यात आला. श्रीमाताजींनी केक कापून - इस्टर - साजरा केला. श्रीमाताजींना पापाजींनी केक भरविला. त्यानंतर श्रीमाताजींना भेटवस्तू अर्पण करण्यात आल्या. त्यानंतर सर्वांना केकचा प्रसाद वाटण्यात आला. श्रीमाताजी व श्रीपापाजी सोबत साधनादीदी होत्या. कार्यक्रम संपला तेव्हा रात्रीचे १०.३० वाजून गेल

त्यानंतर श्रीमाताजीच्या समोर दिनांक १७ एप्रिल रोजी मुंबईचे श्री व सौ वझे आणि सहकारी यांच्या मुझिक प्रोग्रामचे आयोजन केले होते. त्यावेळी त्यांनी शुभमंगल दिवस आया, गज मुखा गणेशा, श्री जगदंबे आई रे मेरी निर्मल मा, हे माँ तेरी सुरतसे अलग भगवान की सुरत क्या होगी.ही भजने झाली.

त्यानंतर दिनांक २१ एप्रिल २००६ रोजी दुपारी ४.०० च्या सुमारास श्रीमाताजींच्या समोर पुणे मुझिक ग्रुपने जागो सवेरा आया है हे भजन सादर केले. त्यानंतर रात्री ७.०० च्या सुमारास श्रीमाताजींचे पुण्यातून मुंबईकडे निघाल्या. आज श्रीमाताजी लाल साडीत अत्यंत सुंदर व प्रसन्न दिसत होत्या. त्यांना निघताना सुवासिनींनी पंचारतीने ओवाळले. त्यानंतर त्या गाडीत बसल्या. प्रतिष्ठानवर सर्वत्र रांगोळ्या व फुलांची आरास केली होती. त्यांच्यासोबत श्रीपापाजी व साधनादीदी होत्या.

॥ जय श्रीमाताजी ॥

# भारत - संतांची योगभूमी

दुर्लभम् भारते जन्म असे म्हटले जाते.प्रभू श्रीरामचंद्रांनीही म्हटले आहे, जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी । याचा अर्थ आई आणि मातृभूमी हे स्वर्गाहूनही श्रेष्ठ आहेत. कशी आहे आपली भारतमाता? ही अत्यंत प्राचीन आहे. सस्यशालिनी आहे, सुजला सुफला आहे. येथे असणारी मृत्तिका हीदेखील कस्तुरीप्रमाणे आहे. जे, जे, उत्तम आहे, उदात्त आहे, ते ते परमेश्वराने या भूमीस उदंड दिले आहे. अशा या भारतभूमीच्या उदरातून अनेक संत-महात्मे जन्माला आले. उदा. निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई, नामदेव,तुकाराम, एकनाथ, रामदास स्वामी, मीराबाई.....

या सर्व संतांना त्याकाळी समाजाकडून ताप झाला तरी हे सर्व संत मात्र हिमनगासारखे शीतल राहून समाजाला सातत्याने क्षमा करीत मोक्षाच्या वाटेवर चालतच राहिले.

या सर्वांचे परमेश्वरावर निर्व्याज प्रेम होते. अपार भक्ती होती. असेच प्रेम जे सर्वांवर करीत. संतांचे वर्णन परोपकाराय सतां विभूतय: असे केले जाते.

श्रीमाताजी सर्व सहजयोग्यांना संत-महात्मे म्हणतात. याचा अर्थ श्रीमाताजींना आपल्याकडून असे वर्तन अपेक्षित आहे, की जे संतमंडळींचे वर्तन असते. म्हणजे कसे? तर अबोधितता, शुद्ध इच्छा, धर्माचरण, सर्वांठायी प्रेम, मधूर वाणी, दया, क्षमा, शांती वगैरे. जर आपण सर्वांनी आपले आत्मपरीक्षण केले, तर श्रीमाताजींना अपेक्षित वर्तन आपले होत आहे का? याची उत्तरे सापडतील. त्यासाठी आपण एक-एक संतांची महती थोडक्यात पाहणार आहोत. याचा अभ्यास आपल्याला आपले आत्मपरीक्षण करण्यास निश्चितच उपयुक्त ठरेल.

## संत नामदेव

एकदा श्रीविष्णूंनी अवतार घेण्यासाठी उद्धवाला पृथ्वीवर पाठविले. एका शिंपल्यात, भीमा नदीच्या प्रवाहात उद्धवाला श्रीहरीने सोडले. तेच हे संत नामदेव.

पंढरपूर येथे दामाशेटी नावाचा एक शिंपी होता. त्याला अनेक वर्षे मूलबाळ नव्हते. दोघे पती-पत्नी विठ्ठलाचे निस्सिम भक्त होते. एकदा विठोबाने स्वप्नात येऊन त्याला सांगितले, उद्या तू भीमेवर स्नानास जा. तेथे एक शिंपला तुला वाहताना दिसेल. त्यात एक बालक असेल, ते तू घरी नेऊन त्याचा सांभाळ कर. तो उद्धवाचा अवतार आहे. तो मोठा किर्तिवंत होईल. दुसरे दिवशी भीमातीरी दामाशेटीला खरोखरच एका शिंपल्यामध्ये एक तेजस्वी बालक आढळले. त्या दांपत्याने त्या मुलाचे नाव नामदेव ठेवले. छोटा नामदेव जसजसा वाढू लागला, तसतशी त्याची विठ्ठलावर खूप भक्ती जडली.

एकदां वडील बाजारात गेले असताना, आईने नैवेद्याचे ताट वाढून छोट्या नामदेवाला देवळात पाठविले. नामदेवाने पूजा करून नैवेद्य दाखविला. परंतु पांडुरंग काही केल्या भोजन करीना. छोटा नामा रडू लागला. त्याने देवाला आळवले. हे देवा, तू जेवला नाहीस तर मला आई रागवेल. मारेल. तेव्हां कर ना रे भोजन! तू माझ्यावर रागावला आहेस का? त्याची ती भक्ती पाहून साक्षात भगवंतांनी त्याला दर्शन दिले व भोजन केले. विठुराजा जेवला म्हणून नामाला खूप आनंद झाला. रिकामे ताट घेऊन नामा घरी आला. आईला सांगितले, तेव्हा तिला खरे वाटेना. दुसरे दिवशी आपल्या वडिलांबरोबर नैवेद्याचे ताट घेऊन तो देवळात गेला. परंतु विठोबा काही खाईना. नामा रुसला, रागावला. तो देवाला म्हणाला, देवा, तू भेदाभेद करतोस. विठ्ठलाला हसू आले. त्याचा हट्ट पुरविण्यासाठी प्रत्यक्ष पांडुरंग पुन्हां अवतरले आणि भोजन केले.


नामदेवांची भक्ती दिवसेंदिवस वाढतच होती. पुढे त्यांचा विवाह होऊन त्यांना एक पुत्र झाला. त्याच्या नामकरण सोहळ्याला प्रत्यक्ष पाडुरंग हजर झाले. त्यानी













## इस्टर पूजा, प्रतिष्ठान पुणे, २००६









## इंटरनॅशनल मदर डे









## प्रतिष्ठान, पुणे आगमन १६ एप्रिल २००६






## प्रतिष्ठान पुणे प्रस्थान २१ एप्रिल २००५






## श्रीमाताजीचे यु. के. मध्ये आगमन, दि. २२ एप्रिल २००६









## सेंट जॉर्ज दिन २००६











(विठोबांनीच)त्यांच्या मुलाचे नाव ''नारायण'' ठेवले.

विठ्ठलाच्या भजन कीर्तनात मात्र नामदेव सतत दंग असत. एकदा त्यांची आई त्यांना खूप रागावली. तू जर असं सारखं वागलास तर तुझा संसार कसा होणार रे? नामदेवांना खूप वाईट वाटले. विठ्ठलाला त्यांची दया आली. त्यांनी एका दानशूर व्यक्तीचे रूप घेऊन एक सुवर्ण मोहरांची गोणी नामदेवांच्या घरी नेऊन दिली. नामदेवांनी जाणले, की हे सर्व विठोबाचेच काम आहे. त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. परंतु, पांडुरंग आपल्यासाठी भरलेल्या द्रव्याचे पोते घेऊन आला, म्हणजे त्याला आपण श्रम दिले. याचे मात्र दु:ख त्यांना झाले. त्यांनी ते सारे धन गावातल्या गोरगरिबांना वाटले; व स्वत: भक्तीमध्ये रममाण झाले.

एकदा पंढरपूरला ज्ञानदेव गेले असता, नामदेवांनी त्यांचे चरण पकडले. ज्ञानदेव म्हणाले - नामदेवा, तुझ्याबरोबर तीर्थयात्रा करावी असा हेतू आहे. यावर नामदेव म्हणाले, आपण विठूमाऊलीला विचारू. दोघेही मंदिरात गेले. त्यांना साक्षात दर्शन देऊन विठोबा म्हणाले, ज्ञानदेवा, तू तर साक्षात आत्मरूप ! मग तुला यात्रेला जाण्याचे कारण काय? तेव्हा ज्ञानदेव म्हणतात, नामदेवासारख्या प्रेमळ भक्ताचा सहवास घडावा हाच मुख्य हेतू आहे. विठूरायांना परवानगी देऊन ते म्हणाले, नामदेवा, ज्ञानदेव म्हणजे मूर्तिमंत परब्रह्म आहे! तसेच ज्ञानदेवांना सांगितले, ज्ञाना हा नामा म्हणजे माझा भोळा भक्त आहे रे ! दोघेही पांडुरंगाचा आशीर्वाद घेऊन तीर्थयात्रेला निघाले. दोघेही प्रवास करीत करीत हस्तिनापुरी आले. तेथील सान्याजणांनी या थोर संतमंडळींचे स्वागत केले.

दोघांची भजने, कीर्तने गावात रंगू लागली. तेथे एक मुस्लिम राजा राज्य करीत होता. त्या राजाला हे सर्व पाहून खूप राग यायचा. त्याने नामदेवांची परीक्षा घ्यायचे ठरविले. नामदेवांचे कीर्तन ऐन रंगात आले असतांनाच, तेथेच राजाने एका गायीचा वध घडविला आणि तो राजा नामदेवांना म्हणाला, हे बघ जर तुझी भक्ती खरीखुरी असेल तर या गाईला तू जिवंत करून दाखव. गाय जिवंत होऊ शकली नाही, तर मी तुझी हत्या करणार. नामदेवांनी त्यांचेकडे चार दिवसांची मुदत मागितली. नामदेव सतत ३ दिवस विठोबाला प्रार्थना करीत होते. एकीकडे डोळ्यांतून अश्रू. शेवटी चौथ्या दिवशी पांडुरंग अवतीर्ण झाले. नामदेवांनी त्यांना विचारले, विठुराया इतका उशीर का लावलात? ४ दिवस एवढा अंत का पाहिलात? पांडुरंग उत्तरतात, अरे तूच तर चार दिवसांची मुदत मागितलीस। म्हणून तुझा शब्द राखायला आज यावे लागले. तू जर राजाला म्हणाला असतास की गाईला तत्काळ जिवंत करतो, तर मी तुझ्यासाठी लगेचच धावत आलो असतो. असे म्हणून भगवंत अदृश्य झाले. नामदेवांनी डोळे उघडून पाहिले तर काय? गाय जिवंत होऊन त्यांचे पाय चाटत होती. जमलेले सारे लोक भारावून गेले. राजाने नामदेवांचे चरण धरले.

असंच दोघेजण अनेक तीर्थक्षेत्रे पहात पहात औंढ्या नागनाथला आले. तेथील देवळात नामदेवांनी कीर्तनास आरंभ केला. देवळात अफाट गर्दी जमली. पुजारी ब्राह्मणाला आत देखील शिरता येईना. रोजची पूजेची वेळ होऊन गेली. ब्राह्मणाचा राग अनावर झाला होता. इकडे कीर्तनात भक्तीरसाचा महापूर आला होता जणू ! पुजाऱ्याने त्याला साथ देणाऱ्या आणखी काही ब्राह्मणांना बरोबर घेतले आणि मंडळी आत घुसली. त्यांनी नामदेवांना हुसकावले आणि सांगितले की मंदिराच्या मागे जाऊन खुशाल टाळ बडवत बैस. नामदेवांनी देवळाच्या मागील बाजूला कीर्तन चालू ठेवले. डोळ्यात मात्र अश्रू होते. हे देवा तू माझ्याकडे पाठ करून कां बसलास? तुला माझे कीर्तन आवडले नाही का? माझ्याकडे बघ नां एकदा ! नामदेव पांडुरंगाचा धावा करू लागले अन् काय आश्चर्य ! औंढ्या नागनाथाचे पूर्वाभिमुख देऊळ पश्चिमाभिमुख झाले. भगवंत परत नामदेवासमोर आले. अख्खे देऊळच फिरलेले पाहून ब्राह्मण पुजाऱ्यांनी स्वत:च्या कर्मठपणाबद्दल नामदेवांची क्षमा मागितली. संत नामदेव कोण आहेत हे त्यांनी तेव्हा ओळखले.

औंढ्या नागनाथाहून मंडळी आता पंढरीची वाट चालू लागली. पंढरीत पोहोचताच, विठाई माऊलीचे दर्शन घेण्यासाठी वाकत असतानाच प्रत्यक्ष पांडुरंग विटेवरून उतरून त्यांच्या भेटीला आले. इतर संत मंडळीही आली होती. पांडुरंग नामदेवाला म्हणाले, नामदेवा तू आता यात्रा करून आला आहेस तर ब्राह्मण भोजन घाल. यात्रेचे मावंदे कर.(भगवंताची लीला, त्यांची योजना काही वेगळीच होती)

नामदेवांसमवेत भगवंत स्वत: एका गृहस्थाचे रूप घेऊन निमंत्रणाला गेले. भगवंत स्वत: ब्राह्मणांना आमंत्रण देत देत चालले होते. ब्राह्मण मात्र, हा इतका तेजस्वी गृहस्थ कोण आहे? असं विचारत होते. त्यावर पांडुरंग उत्तरत, मी नामदेवांचा सखा आहे. माझी माहिती या इतर संतमंडळींनाही आहेच. नंतर रुख्मिणी देवींना त्यांनी घडलेली हकीगत सांगितली. ते म्हणाले, मला आमंत्रणाच्या वेळी सर्व संत मंडळींनी ओळखले. परंतु या कर्मठ ब्राह्मणांपैकी कोणीही मला ओळखले नाही !

यात्रेच्या मावंद्याची छान तयारी झाली. सर्व तयारी करण्यासाठी अष्टसिद्धी आल्या. मधूर -सुग्रास भोजन तयार झाले. मंगल वाद्ये, रांगोळ्या, चंदनाचे सडे, नामदेवांना स्नान, औक्षण....सोहळा पहायला अवघी पंढरी जमली होती. सारेच अलौकिक, अद्‌भुत.

प्रत्यक्ष भोजनाच्या वेळी पांडुरंग नामदेवांचे उष्टे खाऊ लागला. ब्राह्मणांना ते बिलकूल आवडले नाही कारण एकतर नामदेव हे जातीने शिंपी आणि त्यात त्यांचे उष्टे ?

त्यावर पांडुरंग त्यांना म्हणतात, तुम्ही ब्राह्मण केवळ नावाने ब्रह्मवेत्ते आहात. ब्रह्मनिष्ठा म्हणजे काय हे तुम्हाला समजलेलेच नाही. भेद-भावाने तुम्हाला ग्रासले आहे. संशयाची भावना तुमच्या मनात आहे. पण नामदेव हा समभावाचे आचरण करतो. संकल्प विकल्पाच्या पलीकडे तो गेला आहे. मी नामदेवाच्या पंक्तीला भोजन केले, त्याचे उष्टे मी खाल्ले, कारण तो त्याच योग्यतेचा आहे. अशाप्रकारे देव हा भक्तीचा भुकेला हे भगवंतांनी दाखवून दिले. परमेश्वरावर गाढ श्रद्धा असली की झाले. त्यासाठी गरीब-श्रीमंत, जात-पात, काळा-गोरा या गोष्टीचा काहीही संबंध नाही. ॥जय श्रीमाताजी ॥

● ● ●

महाराष्ट्र राज्यासाठी सहजयोग कोऑर्डिनेटरांची खालील कमिटी आहे.

| | |
|---|---|
| श्री राजेंद्र पुगालिया | कोऑर्डिनेटर |
| श्री पराग राजे | मेंबर |
| श्री सदाशिव शुक्ला | मेंबर |
| श्री मिलींद शेलसाळे | मेंबर |
| डॉ. उदवानी | मेंबर |
| श्री. बी.जी.पाटील | मेंबर |
| श्री सिद्धार्थ गुप्ता | मेंबर |

दिनांक २७ ऑगस्ट २००६ रोजी महाराष्ट्रातील सर्व सिटी कोऑर्डिनेटर आणि मेंबर यांची सभा कोथरुड आश्रमात आयोजित केली आहे.

## उत्तरांचल राष्ट्रीय सहजयोग सेमिनार २००६, यमकेश्वर (बडी बडोली) जिल्हा पौडी (उत्तरांचल)

यमकेश्वर हे सेमिनारचे ठिकाण हरिद्वार पासून बसने ५-६ तासांच्या अंतरावर तर दिल्लीपासून ट्रेनने कोटद्वारला उतरल्यावर ३ तासांच्या अंतरावर आहे. हिमालयाच्या अत्यंत उंच अशा पहाडाच्या दरीत असलेल्या सपाट जागेत आहे. सेमिनारसाठी संपूर्ण भारतातून सहजयोगी आले होते.

दिनांक ३ जुन २००६

आजच्या सेमिनारच्या पहिल्या दिवशी संध्याकाळी ७.१५ च्या सुमारास हवन घेतले. हवनाची सुरवात तीन महामंत्रांनी झाली. त्यानंतर सर्वांनी वरुणदेवाला पाऊस थांबवण्यासाठी प्रार्थना केली. त्यानंतर सकाळपासून पडत असलेला पाऊस हवनाच्या वेळी श्रीमाताजींच्या कृपेत थांबला. हवनासाठी सर्व राज्यांच्या कोऑर्डिनेटर्सना तसेच ट्रस्टी यांना हवनासाठी बोलवण्यात आले. त्यानंतर उत्तरांचलचे कोऑर्डिनेटर श्री जसपाल सिंग यांनी श्रीमाताजींच्या प्रत्येक स्तुतीच्या शेवटी स्वाहा करताना कशी कृती करावयाची याची माहिती दिली. त्यानंतर हवनाची सुरवात तीन महामंत्रांनी झाली. त्यानंतर अथर्वशीर्ष व श्रीमाताजींची वेगवेगळी स्तुती करीत श्री माताजींच्या चरणी कोटी कोटी प्रणाम करीत १०८ वेळा स्वाहा केले. हवनाच्या शेवटी सर्वांनी सामूहिक बाधा स्वाहा केल्या. त्यावेळी साधारण ८.३० वाजले होते. त्यानंतर आरती झाली. हवन संपेपर्यंत पाऊस थांबला होता. त्यानंतर आरतीच्या वेळी परत जोराचा पाऊस सुरू झाला. त्यामुळे सर्वांना मुख्य पेंडॉलमधे एकत्र जमण्याचे सांगण्यात आले.

मुख्य पेंडॉलच्या मागच्या बाजूला श्रीमाताजींचे शिव स्वरूपातील डोळे असलेले भव्य चित्र तर एका बाजूला श्रीमाताजींचे चरण तर दुसऱ्याबाजूला श्रीमाताजींचा



आशीर्वादाचा हात. असे स्टेजवर भव्य डेकोरेशन केलेले होते. मुख्य पेंडॉलमधील कार्यक्रमाची सुरूवात तीन महामंत्रांनी झाली. त्यानंतर राजेश युनिवर्स यांनी 'जय गणेश जय गणेश देवा', 'भगवती माँ निर्मला', 'तुझको पाकर श्री माँ हमने जन्नत को पालिया' ही भजने सादर केली. श्री सुब्रमण्यय यांनी, 'माँ हमारी वंदना स्वीकार करो' श्री शंभो यांनी मटक्याच्या ठेक्यावर, 'ध्यान करे भाई पार उतर जा', 'महामाया करे देखा करे पूजा करे दिन रात ' शेवटी मुखिराम यांनी, 'तेरे सहजी पुकार रहे आज आवो मेरी निर्मल माँ' हे भजन सादर करून रात्रीचा कार्यक्रम संपवला.

दिनांक ४ .६.२००६

आजच्या कार्यक्रमाची सुरूवाल सकाळी ६.०० ते ६.३० पर्यंत सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर सकाळी ११.०० च्या सुमारास सकाळच्या सत्राची सुरूवात डॉ राजेश यांनी, ' जय आदिशक्ती निर्मल माँ', श्री शंभु यांनी, 'हम तेरे बालक तुम हो हमारी माँ' ही भजने झाली. त्यानंतर ट्रस्टी श्री राजीवकुमार व सहकारी यांच्या हस्ते सेमिनारच्या दीप प्रज्वलनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर यमकेश्वर परिसरातील रहिवाश्यांसाठी पब्लिक प्रोग्रामचा कार्यक्रम झाला . त्यामध्ये श्री जसपाल सिंग यांनी सर्वांना सामूहिक जागृती दिली. पब्लिक प्रोग्रामसाठी यमकेश्वर परिसरातील अनेक शासकीय अधिकारी उपस्थित होते.

त्यानंतर हरिद्वारचे एस.पी. श्री एस.एस.नोगी यांनी पहाडी भाषेत सहजयोगाचे फायदे सर्वांना सांगितले.

त्यावेळी ब्लॉक प्रमुख मिसेस रेणु बिस्ट यांनी जागृती घेतली आणि सहजयोगाचे कार्य संपूर्ण उत्तरांचल राज्यात करून सर्व पहाडी लोकांना जागृती देण्याची आवश्यकता असल्याचे व त्या कार्यात प्रत्यक्ष सहभाग घेणार असल्याचे सांगितले. जागृती घेतलेल्या सर्वांना दिनांक ७ जून रोजी ह्याच ठिकाणी फॅालोअपसाठी निमंत्रण देण्यात आले. .

संध्याकाळी ६.३०च्या सुमारास कार्यक्रमाची सुरवात मुखिराम यांच्या,'जय गणेशजी की माँ अंबे' या भजनाने झाली. त्यानंतर डॅा राजेश यांनी, 'मेरी माँ पूनम का चांद' मुखिराम यांनी,'मेरा कोई न सहारा बिन तेरे',सुब्रमण्यम यांनी, 'देती है जागृती','छिंदवाडामे जनम लिया हमारी निर्मल माँ ने', श्री अरुण आपटे यांनी, 'अबिर गुलाल' हे भजन सादर केले. त्यानंतर पेंडॅालमध्ये उपस्थित असलेल्यांकडून लेखी प्रश्न मागविण्यात आले त्याची उत्तरे ट्रस्टींकडून देण्यात आली. त्यावेळी त्यांनी सहज विवाहाबद्दल विशेष मार्गदर्शन केले. शेवटी धरम शाळा स्कुलची सी.डी. दाखविली.

दिनांक ५.६.२००६

आजच्या कार्यक्रमाची सुरवात सकाळी ६.०० ते ६.३० च्या सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर सर्वांना पेंडॅालच्या बाहेरच्या मोकळ्या जागेत एकत्र येऊन सामुहिक जोडेपट्टी करण्याची माहिती दिली. त्याचवेळी सर्वांकडून अल्ला हू अकबर म्हणून विशुद्धी स्वच्छ करण्याची माहिती दिली.

सकाळी १०.३० च्या सुमारास कार्यक्रमाची सुरवात डॅा राजेश यांच्या, 'सुमर मना सुमर मना' ह्या भजनाने झाली. त्यानंतर शंभु, 'आज माँ दुनिया मे आई . मध्यप्रदेश छिंदवाडामे जनम पाई','ध्यान बिना कुछ पावत नाही',सुब्रमण्यम यांनी,'माँ निर्मल माँ जय जय माँ निर्मल माँ', मुखिराम यांनी,'नाम रखले श्रीमाँ का नाम रख ले','सहजयोग की नैया के चलो पार' ही भजने झाली.

सकाळी ११.३० च्या सुमारास मेडिकल संदर्भात प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यावेळी



मेडिकल संदर्भात विचारलेल्या प्रश्नांना डॅा शेटे, डॅा बासू, डॅा सौदी यांनी माहिती दिली. त्यामध्ये वेगवेगळे आजार सहजयोगातून कसे बरे करता येऊ शकतात याबाबत माहिती दिली. त्यानंतर श्री जसपाल सिंग यांनी पुणे मिटींग मधील प्रोटोकॅालबद्दल सांगितलेल्या माहितीचा अहवाल वाचून दाखविला.दुपारी श्री अरुण आपटे यांनी,'उमा उमा शिव शंकर' हे भजन सादर केले.

दुपारी ४.०० युवाशक्तीची मिटींग झाली. त्यानंतर ५.०० पासून सांस्कृतिक कार्यक्रम सुरू झाले.त्यामध्ये अनेक नवीन कलाकारांनी आपली भजने सादर करून सर्वांची वाहवा मिळविली.त्यावेळी कार्य शर्मा डेहराडून-जय गणेश जय गणेश, भारती/रानी-माँ मुझे तुही नजर आये, एन.जी.ओ. आनंदिता-तेरे दरपे जो भी रब्बा आये, नम्रता,कानपूर-निर्मल निरामय, अनुप-या कुंदे तुत सार , सचिन पानसरे यांनी राईट साईड/लेफ्ट साईड सहजयोग्याविषयी माहिती देताना सर्वांना हसविले. दिपाली,कानपूर-मन मस्त हुवा फिर क्या बोल, कानपूर कलेक्टिव्हीटी-मेरी माँ पुनम का चांद,दिपीका,लखनौ-नमामी श्री गणराज दयाला, त्यावेळी सुरेंद्र सावी/राजपाल यमुनानगर यांनी,'दर दर भटका मैं सारी जिंदगी, मधूदीदी- महाराष्ट्र- श्रीमाताजींकि आगे नाचूगी, आशिष वर्मा यांनी,'तेरे भरोसे हमने छोडी है नैया' ही भजने सादर केले त्यावेळी सर्वांनी त्यांचे कौतुक केले.

त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमामधील नृत्याचा कार्यक्रम सुरू झाला. त्यात, मनिषा-गणेश वंदना,



हरिद्धार मधील चार मुर्लींनी सरस्वती वंदना, गझियाबाद,डेहराडून - कॅसेटवर नृत्य, त्यावेळी कुमारी आकांक्षा हिने,'यहा प्रेम की गंगा बहेती है'' ह्या भजनावर नृत्य करीत सर्वांची वाहवा मिळविली.अरुणा दिल्ली-बिंदीया का माथेपे ठाया, शिवानी-ममता मयी माँ दुर्गासी लागे,

त्यानंतर एन.जी.ओ. ग्रुपचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी, ''परमेश्वरी निर्मला हमे तेरे ममता का आश्रय मिला'' या भजनावर सामूहिक नृत्य करीत शेवटी प्रत्यक्ष रंगांची स्टेजवर उधळण करून सर्वांची वाहवा मिळविली. डेहराडूनच्या ग्रुपने -माता ओ माता या गाण्यावर नृत्य सादर केले. त्यानंतर पंजाबी नृत्य पेंडॉलच्या बाहेरच्या बाजूपासून सुरू करीत स्टेजवर आगमन झाले. त्यानी अतिषय जोशपूर्ण पंजाबी नृत्य करून सर्वांना चकित केले.

शेवटी एन.जी.ओ व वाशी आश्रमाची सी.डी. दाखविणात आली.

दिनांक ६.६.२००६

आजच्या कार्यक्रमाची सुरूवात सकाळी ६.00 ते ६.३0 सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर सर्वांनी सामूहिक जोडेपट्टी, अल्ला हू अकबर म्हणून विशुद्धी स्वच्छ केली.


सकाळी १0.00 च्या सुमारास सर्वजण पेंडॉलमध्ये जमले त्यावेळी सर्वांना आपले अनुभव सांगण्यासाठी बोलविण्यात आले. त्यावेळी अनेक हृदयस्पर्शी अनुभव सांगितले गेले. त्यानंतर दुपारी १.३0 च्या सुमारास सेमिनारमध्ये येऊन देखील अजूनही ज्याना चैतन्य जाणवत नाही अशांसाठी सामूहिक जागृती देण्यात आली. त्यानंतर सर्वांना ''चित्त ध्यानाची'' अनुभूती देण्यात आली.शेवटी श्री मुखिराम यांनी,'भोले बाबा चले कैलास', 'मन मे प्रेम','भर दे झोली जो मैया तेरे द्धार मे', 'महामाया महाकाली' ही भजने झाली.

संध्याकाळी ७.३0 वा एकमेकांना व्हायब्रेशन देण्याची प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. त्यानंतर प्रत्यक्ष स्टेजवर कॅन्डल ट्रिटमेंट तसेच कापूर ट्रिटमेंट कश्या द्यावयाच्या याचे प्रात्यक्षिक दाखविले. मटका ट्रिटमेंट पध्दत दाखविली. पेपर बर्निंग पध्दत दाखविली, दोरा बर्निंग ट्रिटमेंट पध्दत दाखविली, वॉटर ट्रिटमेंट दाखविली, डोक्याचे मसाज कसे करावयाचे ते प्रत्यक्ष दाखविले.

त्यानंतर सर्व सहजयोग्यांच्या वतीने मुख्य आयोजक श्री जसपालसिंग यांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला.

त्यानंतर रात्री ९.00 च्या सुमारास स्टेजवर मुख्य कलाकारांच्या भजनाच्या कार्यक्रमाची सुरूवात झाली. त्यामध्ये सुब्रमण्यम यांनी,' माँ शारदे विद्या दायिनी','श्रीमाताजींची १0८ नावे','माँ चरणोपर बनी बनी जाऊ','मेरी दुनिया है तेरे चरणोमें','जय निर्मल जय निर्मल गाया करो','ब्रह्म शोधिले ब्रह्मांड मिळाले','आखोमे बसी हो माँ मेरे दिलमे बसी हो माँ', 'जय जय जय अन्नेश्वरी'ही साधारण तासभर भजने सादर केली. त्यानंतर डॉ अरुण आपटे यांनी, 'मारो प्रणाम बाके बिहारी','माताजी तुही भवानी','सैया निकस गये' ही भजने सादर केली. त्यानंतर मुखिराम यांनी,'लिखने वाले तू होके कयाम लिखले','जय माताजी निर्मल माताजी','नाम रखले तु माँ का नाम रखले', 'मैया के डेरा बोल बोल मोर बोले' ही भजने सादर करताना सर्वांना नाचवले.

रात्री १.00 च्या सुमारास राजेश युनिव्हर्स यांचे स्टेजवर आगमन झाले.त्यांनी सुरवातीला, 'भजोरे सहजी निर्मल माँ का नाम','एक झोली मे फुल एक झोली मे काटे','असा ट्रा तेनू रब्ब' ही भजने सादर करताना सर्वांना शेवटी नाचवले त्यावेळी रात्रीचे २.३0 वाजून गेले होते.





त्यानंतर सर्व गायकांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी सेमिनारसाठी आलेल्या एकूण २५६८ सहजयोग्याची राज्यवार यादी वाचून दाखविली त्यात मद्रास पासून जम्मू-काश्मीर, नेपाळ पर्यंत सर्व राज्यातून सहजयोगी आल्याचे त्यांनी वाचून दाखविले. त्यानंतर सेमिनारची सांगता झाल्याचे सांगण्यात आले. त्यावेळी रात्रीचे ३.०० वाजले होते.

डिसेंबरामध्ये हरिद्वार सेंटरचे सहजयोगी यांनी पब्लिक प्रोग्रामसाठी यमकेश्वर येथे आले असता तेथील जागा व चैतन्य पाहिल्यावर या ठिकाणी सेमिनारचे आयोजन करण्याचे ठरविले. डिसेंबरपासून सेमिनारची तयारी सुरू केली. त्यामध्ये जसपाल सिंग, सुभाषचंद्र गोयल, दिनेश चावला, राजेश शर्मा, जी.डी.शर्मा, एस.एस.नोगी व सहकाऱ्यांनी काम पाहिले. त्यांनी अनेक कमिट्या तयार केल्या. सेमिनारच्या ठिकाणी ८ दिवसापूर्वीपासून सर्व व्हॉलेंटिअर्स आले होते. मुख्य पेंडॉल ३०० फुट बाय २०० फुट असा साधारण ३५०० सहजयोगी बसू शकतील असा तयार केला होता. त्याच्या बाजूला लेडिजसाठी व सिनीयर सिटीजनसाठी असे दोन मोठे पेंडॉल त्याच्या मागच्या बाजूला साधारण २००फुट बाय १०० फुटाचे किचन, तसेच साधारण एक फर्लांगावर आणखी दोन मोठे पेंडॉल, व जवळपास ७१ लहान तंबू लावले होते. चार ठिकाणी कमानी उभारल्या होत्या.

पिण्याच्या पाण्यासाठी तीन स्वतंत्र विहिरी घेतल्या होत्या. जेवणाची व्यवस्था अत्यंत सुंदर केली होती. त्यामध्ये सकाळी ६.०० चहा नंतर १०.०० नाष्टा, १.०० जेवण, ४.०० नाष्टा/चहा व रात्री प्रोग्रामच्यावेळी जेवण ठेवले होते.

यमकेश्वर येथे प्रसिद्ध स्वयंभू शंकराचे मंदिर असून त्याला प्रचंड व्हायब्रेशन्स जाणवत होती. यमकेश्वर परिसरात पूर्वी मार्कंडेय ऋषीचे वास्तव्य होते. त्यांच्या मुलाचे आयुष्य संपल्याने यम त्याला नेण्यासाठी येणार असल्याचे मार्कंडेय ऋषींना कळले. त्यांनी मुलाला शिवमंदिरातील लिंगाला मिठी मारून बसायला सांगितले . त्यानंतर यम आल्यावर प्रत्यक्ष शंकर प्रकट झाला. त्यामुळे यम परत गेला. तेव्हापासून या शिवमंदिरास यमकेश्वर हे नाव पडले असे सांगितले जाते. सदर मंदिर हे गावाच्या मुख्य रस्त्यातच आहे. याबाबत असे सांगितले जाते की, ब्रिटीश सरकारच्या काळात हे मंदिर बाजूला हलविण्याचा प्रयत्न करण्यात आला त्यावेळी लिंगाच्या खालच्या बाजूला खूप लहान लहान सर्प दिसल्याने त्यांनी हे मंदिर हलवण्याचे स्थगित केले.

सेमिनारचे ठिकाण निश्चित झाल्यानंतर सेमिनार पूर्वी दोन महिने अगोदर टेलिफोनचे टॉवर बसविण्यात आले. तसेच सेमिनारला येण्यासाठीचा रस्ता पूर्वी फार खराब होता. तो सेमिनारच्या वेळी डांबरी करण्यात आला. तसेच सेमिनारसाठी गावातील जवळपास १०० शेतकऱ्यांनी आपली जमीन दिली होती. सेमिनारच्या अगोदर दोन दिवस प्रथमच अचानक श्रीमाताजींच्या कृपेने एक नवीन झरा सुरू झाल्याने गावकरी खुष झाले होते.

सहजयोगाचे सेमिनार हे सुविधांनी युक्त व सर्व आवश्यक माहिती देऊन सेमिनार कसे असावे याचे उत्तम उदाहरण हे यमकेश्वर सेमिनार २००६ पाहिल्यानंतर जाणवते. ● ● ●

## श्री आदिशक्ती पूजा

प.पू. श्रीमाताजी
निर्मला देवींचे भाषण (सारांश)
कबेला, इटली,
२३ जून २००२



तुम्हाला सहजयोगातून मिळालेली शक्ती कार्य करण्यासाठी आहे. सकारात्मक विचार करून, आक्रमकपणा न दाखवता सामूहिक स्तरावर कार्याला लागा.

आजची पूजा ही तुम्हां सर्वांच्या दृष्टीने एक वेगळी पूजा आहे; कारण ही आदिशक्तीची पूजा आहे. आदिशक्ती ही संपूर्णतया परिपूर्ण आहे. तुम्हाला श्रीगणेशांपासून आलेली डावी बाजू आणि उत्थानप्रक्रियेतून डाव्या बाजूवरील सर्व चक्रे यांची माहिती आहे. उजव्या बाजूबद्दल मी जाणूनबुजून तुम्हाला काहीं सांगितले नव्हते. कारण उजव्या बाजूकडे गेलेले लोक हरवून गेले; ग्रंथांमधून त्यांना गायत्री-मंत्र मिळाला पण त्याचा अर्थ त्यांना समजला नाही; यांनी तो मुखोद्गत केला. त्यामुळे ते उजवीकडे झुकले व आज्ञा चक्रावरच अडकले. ते आत्मसक्षात्काराची धडपड करत होते आणि त्यांना असे सांगण्यात आले होते की उजव्या बाजूवरील कार्य नीट चालू ठेवले तर त्यांना आत्मसाक्षात्काराचे परमोच्च ध्येय गाठतां येईल.

पण त्या प्रयत्नांत कुणीच यशस्वी झाले नाहीं; बरेच जण फार तापट स्वभावाचे, शीघ्रकोपी बनले आणि उजव्या बाजूवरील साधना केल्यामुळें दुसऱ्यांना शाप देणें, भस्मसात करणें इ.सिद्धीच फक्त मिळवूं शकले; त्याचा कुण्डलिनी-जागृतीशी कांहीच संबंध नव्हता. याला कारण म्हणजे त्यांची उन्नती आज्ञा चक्राशी थांबली आणि ते अज्ञानाच्या अंधकारांत नाहींसे झाले.तसेच अनेक पुस्तके , ग्रंथ लिहिले गेले पण उजव्या बाजूमधून उत्क्रांतीच्या मार्गावरील प्रवास खडतर व धोकादायक असतो हे लक्षांत न घेता हे ग्रंथ लिहिले गेले. सगळ्यांत उत्तम मार्ग म्हणजे कुण्डलिनी जागृत करणें; जागृत झाल्यावर ती तुम्हाला मध्यमार्गातून चक्रांच्या बरोबर मधून, आज्ञाचक्र पार करून सहस्रारापर्यंत पोचवते आणि त्याचे भेदन करून बाहेत येते.

सहस्राराचे ज्या ठिकाणी भेदन केले जाते त्याला ब्रह्मरंध्र म्हणतात व त्याचे महत्त्व आतां मी तुम्हाला समजावते. लहान मुलाचा जन्म झाल्याबरोबरच्या वेळी त्याचा टाळूचा भाग थडथड असा उडत असतो. आत्म्याचा शरीरामध्ये याच ब्रह्मरंध्रातून प्रवेश झालेला असतो आणि थोड्या दिवसांत तो भाग टणक होऊन आत्मा तुमच्या हृदयांत येतो. म्हणून तुम्ही आत्मसन्मुख होण्याचा सतत प्रयत्न करत राहिले पाहिजे. कुण्डलिनी सहस्रारांत येणे हीच एक मोठी समस्या होती. तांत्रिक मंडळी उजवी बाजू वापरून तो प्रयत्न करत राहिल्यामुळें काळी विद्या, तंत्रमार्ग इ. करत गेले आणि त्यांची डावी बाजू प्रभावित होत गेली.

त्यामुळें उजव्या बाजूचे लोक तापट, महत्त्वाकांक्षी, आक्रमक बनत गेले आणि शाप देऊन लोकांना ठार मारण्याची प्रवृत्ती वाढत गेली. त्यांतून कुणावरही प्रभुत्व गाजवण्याचे व दुसऱ्याचा काटा काढण्याचे प्रकार वाढत गेले. ब्राह्मण व थोडया फार प्रमाणांत क्षत्रिय लोक असे उजव्या बाजूचे होते; त्यातून ते शक्तिशाली झाले. पण सर्वत्र आपलीच सत्ता स्थापण्याच्या मागे लागले आणि प्रसिध्दीला आले. खरे तर ते तसे नव्हते; तापट व्यक्ती अध्यात्मिक असूं शकत नाहीं; पण उजवी बाजू वापरूनच ते होणार अशा समजुतीमध्ये राहिले; आणि उजवीकडील सात चक्रे त्यांनी मानली. ती म्हजजे भू. भुवः, स्वहा, मनः जनाः, तप; तपः म्हणजे आज्ञा, तिथे मध्यभागी ख्रिस्त आहेत; डावी बाजू म्हणजे जैन धर्म व उजवी बाजू म्हणजे ख्रिश्चन

धर्म; हे खरे तर उत्थानाचे धर्म नसून सत्यशोधनाच्या उर्जेचे वेगळे प्रवाह आहेत.

हे सर्व भारतामध्यें प्रदीर्घ काळ चालूं होते. सर्व गुरू, साधू -मुनी, तपस्वी हजारो वर्षांपासून हेच करत आले. पण शेवटापर्यंत कुणीच पोचले नाहींत. तपस्वी लोक शाप देण्यांत मग्न होते, नजरेच्या एका कटाक्षामधूनही समोरच्या व्यक्तीला जाळून टाकणें ते सहज करू शकत होते. पण त्यापैकी कुणालाही आत्मसाक्षात्कार मिळवता आला नव्हता. भारत, ग्रीस, ईजिप्त, इंग्लिश, जर्मन, रोमन या सर्व इतिहासांत दुसऱ्यावर आक्रमण करणें, दुसऱ्यांची जमीन-मालमत्ता बळकावणें इ. सत्तापिपासूपणाची अनेक उदाहरणे सापडतात. आक्रमकपणा व हत्या हे प्रकार पराकोटीला पोचले होते; मानवजातीवर जुलूम झाले. जणूं एक राक्षस-वंशच प्रबळ झाल्यासारखे वाटावे. आज्ञाचक्रावर तर येशू ख्रिस्तांना ठार मारले गेले. त्याप्रमाणें अनेक साधु-संतांचा, अवतरणांचा छळ झाला. श्रीरामांच्या कालापासून इतिहास हेच दाखवतो. अलीकडचे उदाहरण म्हणजे हिटलर; निर्दयपणाची त्याने कमाल केली, बेसुमारपणे लोकांची त्याने कत्तल करवली. पृथ्वीतलावर असे एकामागून एक भयानक राक्षस आले आणि जगभरांत अशांतीचे साम्राज्य निर्माण झाले. उजव्या बाजूकडून उन्नतीच्या मार्गावरील या प्रभावानें अध्यात्मिक उन्नती दूरच राहिली. त्या काळांत साधु-संताचे व अवतारी महात्म्यांचे रक्षण झाले हाही एक चमत्कारच होता.

म्हणून मी कुण्डलिनीचा विचार करू लागले. कुण्डलिनीची जागृती हाच एक उपाय आहे हे लक्षांत आले आणि त्यासाठींच आपण पृथ्वीतलावर मानवजन्म घेतला आहे हे मला पूर्णपणे ठाऊक होते. त्यातूनच उजवी-डावीकडचे मार्ग सोडून मानव मध्यमार्गावर येऊ शकेल याची मला खात्री होती. पण मी तुम्हाला डाव्या बाजूचे सर्व ज्ञान व कुण्डलिनी जागृत करण्याची क्षमता दिली. त्यातून तुम्ही तुमच्या सहस्राराचे भेदन करू शकला आणि सत्याच्या परमानंदाच्या साम्राज्यांत प्रवेश करू शकला. मध्यमार्गावरील पहिले म्हणजे मूलाधार चक्र जागृत झाल्यावर तुम्ही शुद्ध झालात, पूर्णपणे पवित्र झालात; तुमच्या नजरेतही पावित्र्य आले, वाममार्गाकडे वळेनासे झालात व उथळपणाच्या सर्व सवयी सोडून संत-पुरुष झालात. तसे झाल्याशिवाय तुम्हाला सहजयोग मिळत नाहीं. सहजयोगी उथळ, स्वैराचारी, पैसे लुबाडणारा वा आक्रमक असूं शकत नाही.असे घाणेरडे लोक सहजयोगांतून बाहेर फेकले जातात; त्यांतल्या कांहींना त्याचा राग येतो व ते आपले दात विचकूं लागतात तर कांहीं जणांना आपल्या चुका कळतात. म्हणून सर्वप्रथम तुम्ही शुद्ध व चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व मिळवले पाहिजे व त्याचा सन्मान राखून आनंद मिळवला पाहिजे. डाव्या बाजूवरचे पहिले मूलाधार चक्र, जिथे श्रीगणेश आहेत, जागृत झाल्यावर हे घटित होते.

पुढच्या टप्प्यावर, स्वाधिष्ठानवर कलानिर्मितीमध्यें आक्रमकपणा येऊ लागला. उजव्या बाजूच्या प्रभावाखाली कलेमध्येंही लोक वाट्टेल त्या हीन अभिरुचीची निर्मिती प्रसिद्धि मिळवण्याच्या नादापायी करू लागले. हा स्वाधिष्ठानच्या उजव्या बाजूवरचा दोष आहे. अवतारी पुरुषांनासुद्धा हिडीस प्रकारे दाखवायला त्यांनी कमी केले नाहीं.त्याचप्रमाणे नाभिचक्रावर लोक पैसा कमावण्याच्यामागे लागले व पैशाच्या मोहापायी फसवणूक करूं लागले. भारतासारख्या देशांमध्ये पैशासाठी फसवणूक करण्याची वृत्ती होती तर उजव्या बाजूवरच्या देशांमध्ये पैसा आक्रमकपणें वापरून सत्ता कमावण्याची. ह्या सर्व दुष्कृत्यांमुळे त्यांचेच नुकसान होणार आहे, ते नष्ट होण्याच्या स्थितीला येतील आणि मग त्यांना समजेल की पैसा हा विधायक कार्यासाठी, समाजामध्ये प्रेम व शांतीचे वातावरण निर्माण करण्यासाठी केला पाहिजे. हेच उजव्या बाजूचे लोक हृदय चक्रावर मातृहृदयाची थोरवी विसरले; मुलांवर प्रेम करण्याऐवजी त्यांच्यावर आक्रमकपणें अधिकार गाजवूं लागले; मग मुलांसाठी कांहीं स्वार्थत्याग करणें दूरच राहिले. माताही नवऱ्यावर, मुलाबाळांवर अधिकार गाजवू लागल्या व आक्रमक बनल्या.

पृथ्वीतलावर जन्म घेतल्यावर ही सर्व परिस्थिती पाहून मला धक्काच बसला व या माणसांना कसे सुधारणार हा मोठा प्रश्न मला पडला. नाभीचक्रावरच त्यांची प्रगती थांबली होती. हृदयचक्रावरची स्थिती वर सांगितली पण विशुद्धी चक्रावरही लोक सबंध जग पादाक्रान्त करण्याच्या, जगभर आपलेच साम्राज्य स्थापण्याच्या मागे लागले होते. माणूसपणाच्या भावनाच नसल्यासारखे व्यवहार चालले होते. सत्तेचा अधिकार गाजवणारे आणि सत्तेच्या गुलामीखाली भरडले जाणारे अशा दोनच जाती राहणार अशी परिस्थिती

होऊं लागली होती. पण सुदैवाने सामूहिक कल्याणकार्य करण्याचा प्रयत्न कांहीं संस्था चालवीत आहेत व सुधारणा होण्याची चिन्हे दिसत आहेत; पण त्यांनाही म्हणावे तेवढे यश आल्याचे दिसत नाहीं. कारण ते लोकही स्वत:ला सुधारण्याचा, स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न न करतां दुसऱ्यांवर प्रभाव पाडण्याच्या प्रयत्नात आहेत. या सर्व कारणांमुळे या चक्राचे कार्यही बिघडले आहे.

व्यापक स्तरावरची परिस्थिती पाहिली तर सगळीकडे लढाया, युद्ध, विध्वंस चालू आहे व मोठ्या प्रमाणावर सामान्य माणसे प्राण गमावत आहेत. जगांत अध्यात्मिक उंचीवर आलेले लोक नाहींत असे नाहीं पण कांही ना कांहीं कारणानें ते लोक स्वत:च्या साधनेमध्ये रमले आहेत आणि शांतीचा आनंद घेत आहेत. पण ती शांती आजूबाजूला सर्वत्र पसरली पाहिजे व त्यासाठीं कार्यतत्पर झाले पाहिजे. स्वत:पुरती उन्नती मिळवून त्यांत समाधान न मानता इतरांनाही उन्नतीपथावर आणले पाहिजे व ते कार्य जोमाने हाती घेतले पाहिजे. आपल्याला जगभरातील लोकांमध्ये परिवर्तन घडवून आणायचे आहे. माझ्या दृष्टीनें कार्य करायचे ते मी करेनच पण तुम्ही त्यासाठीं प्रत्यक्ष काय करता हे जास्त महत्त्वाचे आहे.सहजयोगातून आपले किती चांगले झाले एवढयावरच संतुष्ट राहिलात किंवा अहंकारामुळे आज्ञाचक्रावरच राहिलात तर उपयोग नाहीं. आजकाल हाच एक मोठा अडथळा सगळीकडे दिसत आहे; ज्यांनी ज्यांनी अध्यात्मिकतेची उंची व गहनता मिळवली आहे त्यांनी त्याचाच आनंद उपभोगण्यांत, पूजासारख्या प्रसंगांत निष्ठेने भाग घेण्यात समाधानी न राहतां सामुहिक स्तरावर परिवर्तनाच्या कार्यामध्यें भाग घेतला पाहिजे. कांहीं थोडे फार कार्यरत आहेत पण बरेचसे त्याबाबतीत शिथिल आहेत. म्हणून माझे मुद्दाम सांगणे आहे की आत्मपरीक्षण करून तुम्ही प्रत्येकाने आपण सामूहिक स्तरावर किती कार्य करतो, किती लोकांना सहजयोग सांगतो इकडे लक्ष द्या. ख्रिस्तांजवळ फक्त बारा शिष्य होते. पण तुमच्या मानानें त्यांनी प्रचंड कार्य केले. म्हणून तुम्ही उजव्या बाजूमधून कार्यप्रवण व्हा; नुसते शांत, संयमी, एकान्तप्रिय असे कुचकामी बनूं नका. सहजयोगाचा हा उद्देश कधींच नव्हता; उलट जास्तीत जास्त लोकांमध्ये परिवर्तन घडवून आणणे हे सहजयोगाचे ध्येय आहे. हे कार्य करणाऱ्यांचे पाठीमागे माझे आशीर्वाद सदैव राहणार आहेत. आपापल्या देशामध्यें आपण किती लोकांना सहजयोगांत आणले हे तपासून पहा.

याशिवाय तुम्ही पूर्णपणें योग प्राप्त करू शकणार नाहीं. फक्त डाव्या बाजूवरचे प्रेमळ, दयाळू पण अर्धकच्चे योगी व्हाल. याचा अर्थ तुम्ही महत्त्वाकांक्षी व आक्रमक बना असा मुळींच नाहीं. मी कधीं पाहते कीं कांहींजण लीडर बनून फार मोठे कांहीं कार्य करून दाखवण्याच्या मागें असतात; पण त्यांनीही आधीं आपण किती जणांना जागृती दिली आहे हे पहावे. उलट विमानप्रवासामध्ये किंवा रस्त्यावर कांहीं सहजयोगी नवीन लोकांना सहजयोग सांगत असल्याचे मला दिसून आले आहे; तर कांही ठिकाणी स्वत:चा मोठेपणा व शहाणपणा मिरवण्यासाठीं सहजयोगाचा वापर करणारेही मी पाहिले आहेत. तुम्हाला जो सहजयोग मिळाला आहे तो अधिकाधिक लोकांना आत्मसाक्षात्कार मिळवून देण्यासाठी आहे.

विशेषत: सहजयोगातील युवाशक्ती मुला-मुलींना माझे आग्रहाचे सांगणे आहे की त्यांनी आपली सहजशक्ती साध्या व बिनकामाच्या गोष्टींमध्यें वाया न घालवता सहजयोग प्रचार व प्रसार कार्याकडेच लावली पाहिजे. शाळा चालवायच्या, आश्रम चालवायचे किंवा त्यासारखी इतर कामे करायची यामध्यें जास्त रस व वेळ खर्च न करता सहजयोगाच्या प्रसारासाठी वेळ व शक्तीचा वापर करा. अधिकाधिक नवीन सहजयोगी तयार करणे हे युवाशक्तीचे काम आहे. याचाच अर्थ उजवी बाजू काम करत नाहीं; त्यांनी उजव्या बाजूवर यायला हवे.

सहजयोगांत तुमचे पूर्णपणें संरक्षण केले जाते; कुणीही तुम्हाला त्रास देणार नाहीं, छळणार नाहीं किंवा ठार मारणार नाहीं हे मी निक्षून सांगते. तुम्हाला मिळालेल्या शक्ती तुम्ही वापरल्या नाहींत तर मध्येंच अडकून रहाल. म्हणून उजवीकडची शक्ती महत्त्वाची आहे व ती वापरली पाहिजे. पुढच्या वेळेस मी तुम्हाला उजव्या बाजूबद्दल सांगेन, उजव्या बाजूला काय काय आहे ते सांगेन; आतां तुम्ही कितीही प्रयत्न केलात तरी डाव्या बाजूवर येणार नाहींत. म्हणून उजव्या बाजूचे कार्य योग्य दिशेनें व समजूतदारपणे केले पाहिजे; आक्रमकपणे किंवा न समजतां कसेही करून चालणार नाहीं. तसे सहजयोगांतही कांहीं हिटलर प्रवृत्तीचे लोक आहेत. पण आताची

वेळ अशी आहे की पूर्वीच्या काळी संतांनी केलेल्या कार्यापेक्षांही खूप कांही तरी तुम्हाला करायचे आहे. म्हणून सहजयोग स्वत: पुरता ठेवू नका किंवा कुटुंबाकरतां मर्यादित ठेऊ नका तर त्याचा खूप प्रसार करा.

सहजयोगामधून आपल्याला सर्व जग बदलायचे आहे. त्या दृष्टीने तुम्ही कुठे आहांत, सहजयोगासाठी तुम्ही काय केले व करत आहांत हे पहा. आज्ञाचक्रावर कांही सहजयोगी असे होतात की ते कांहींही सहन करतात किंवा कसल्याही यातना सहन करतात; त्याच्या ऐवजी आपल्याला दुसऱ्यांची दु:खे व यातना दूर करायच्या आहेत. पण त्याप्रकारची व्यवस्था किंवा जाणीव आपल्याजवळ नसते. ते झाले तर तुम्हीही पार बदलून जाल. नाहीतर संत-साधूंसारखे तुम्ही आश्रमांत निवान्तपणें बसूनच राहता म्हणून सकारात्मक विचार करून व आक्रमकता न ठेवतां कांहीतरी कार्य हातात घ्या. आपल्याकडे कांही आक्रमकवृत्तीचे, दिखाउपणा करणारे सहजयोगी आहेत हे मी पण जाणते; पण सामूहिक स्तरावर कार्याला लागलात की आपण कुठें कमी पडतो वा आपण काय चुका करतो ते तुमच्या लक्षांत येईल. हे फार महत्त्वाचे आहे आणि कारण इथेंच बरेच सहजयोगी घसरतात. आज्ञा चक्रासाठीं क्षमा करणें महत्त्वाचे असले तरी दुसऱ्यांनी चुका केल्या तरी चालवून घ्या असा त्याचा अर्थ नाही; उलट जो चूक करतो त्याला त्याची चूक स्पष्टपणें दाखवून दिली पाहिजे. हे न करणे अगदीं अयोग्य आहे व त्यासाठीं तुम्ही तडजोड मुळींच करतां कामा नये; तसे कराल तर तुमच्या आत्मसाक्षात्काराला अर्थ उरणार नाहीं.

तेव्हां तुम्ही हें नीट लक्षांत घ्या की तुम्हाला व्हायब्रेशन्स येतात, तुम्ही ध्यान वगैरे करता, दुसऱ्याचे आजार ठीक करु शकता एवढ्यावरच थांबू नका तर सहजयोगाचा प्रसार करा. लोकांना, शेजार-पाजाऱ्यांना सहजयोग सांगा, त्याचे कार्यक्रम करा. आपण एवढ्या मोठ्या संख्येने आहोत पण त्यामानानें प्रचार व प्रसार कमीच होत आहे. म्हणून या कार्यासाठी तुम्ही काय -काय करुं शकता, कुठे, व कसे कार्य करुं शकता याचा नीट विचार करुन कार्याला लागा. तुम्ही सहजयोग चांगल्या तऱ्हेने सांगता, चांगली गाणी म्हणता पण तुम्ही किती लोकांना सहजयोगांत आणले यावरच त्याला अर्थ येणार आहे. टर्कीसारख्या मुस्लिम देशांत २५००० सहजयोगी आहेत. ते फारसे श्रीमंत नसतील पण त्यांना आत्मसाक्षात्काराची महती समजली आहे म्हणून स्वत:चेच प्रश्न व स्वत:लाच त्रास देणारे लोक याचाच विचार करत राहण्याऐवजीं आपल्यासारखी शक्ती दुसऱ्यांनाही कशी मिळवून देता येईल याचा जास्त विचार करा. सहस्रारांत आल्यावर तुमच्याजवळ अनेक शक्त्या आहेत. स्वत:पुरताच सहजयोग करणे स्वार्थीपणा आहे. म्हणून स्वत:चे नांव, प्रसिद्धी, कीर्ती वाढवण्याच्या मार्गे लागण्याऐवजी जास्तीत जास्त लोकांना सहजयोगांत आणण्याच्या कार्याला जोमाने व उत्साहाने लागा.


मला असेही तक्रारीच्या सुरांत सांगितले जाते कीं बरेचसे सहजयोगी मेलेल्या माणसासारखे थंड आहेत; तुम्ही खरेच तसे आहात का? मी एकटी महिला एवढे प्रचंड कार्य करूं शकते तर तुम्ही कां नाहीं करूं शकत. आपापल्या देशांत तरी सगळीकडे जाऊन सहाजयोग पसरवण्याचा प्रयत्न कां नाहीं करत? जरा विचार करा. जोपर्यंत तुम्ही हे करूं शकणार नाहीं तोपर्यंत तुम्ही 'संपूर्ण' बनूं शकणार नाहीं आणि आदिशक्तीची शक्ती तुम्ही यथार्थपणें समजूं शकणार नाहीं. आजच्या या आदिशक्ति-पूजेच्या दिवशींच मी म्हणूनच तुम्हांला सांगत आहे की माझ्या संपूर्ण स्वरूपाची पूजा झाली पाहिजे; फक्त एकाच, डाव्या बाजूच्या शक्तीची पूजा करता येत नाहीं. तसे झाल्यावरच त्याचे सर्व आशीर्वाद तुम्हाला मिळणार आहेत. म्हणून सहजयोगाचा नुसताच प्रसार करून चालणार नाहीं तर लोकांना सहजयोगांत उतरवले पाहिजे. त्यासाठीं तुम्हाला माझे सर्व आशीर्वाद, प्रेम व शक्ती देते. कार्याला लागा.

सर्वांना अनंत आशीर्वाद


● ● ●

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥

## अक्षयतृतिया २००५









## बुध्द पोर्णिमा २००६









# उत्तरांचल राष्ट्रीय सहजयोग सेमिनार २००६





